POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-७९ ● मुंबई, मंगळवार, २१ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

**कूपर रुग्णालय दररोज हजारो रुग्णांना सेवा देते**

जुहू-विद्यापीठ क्षेत्रात स्थित असलेले कूपर रुग्णालय दररोज अंदाजे २,००० रुग्णांना सेवा पुरवते. ज्यामध्ये अंधेरी, सांताक्रूझ, खार, बांद्रा, जोगेश्वरी आणि मालाड येथील रुग्णांचा समावेश आहे. मुंबईच्या दोन्ही आंतरराष्ट्रीय, स्थानिक विमानतळांना आणि पश्चिम एक्सप्रेस हायवेच्या जवळ असलेल्या कूपर रुग्णालयाने आपत्कालीन आणि अपघात प्रकरणांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांत त्याच्या वैद्यकीय सेवांमध्ये मोठा घट झाल्याचे दिसून आले आहे.

## कूपर रुग्णालयात औषधांचा तुटवडा

## रुग्णांची प्राथमिक उपचारांसाठीही कसरत

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबईतील प्रसिद्ध कूपर मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात औषधांची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. ज्यामुळे रुग्णांना मूलभूत उपचारांसाठीही संघर्ष करावा लागत आहे. शहरातील महत्त्वाचे महापालिकेचे रुग्णालय असलेल्या कूपर रुग्णालयात औषधांची कमतरता आणि आवश्यक तपासण्यांमध्ये विलंब, तसेच अँटी-रेबिज लस उपलब्ध न होण्याच्या तक्रारी समोर येत आहेत. ज्यामुळे रुग्णांना खासगी रुग्णालयांमध्ये उपचार घेण्याची गरज पडली आहे.

**महत्त्वाची औषधे उपलब्ध नाहीत**

एफपीजेने दिलेल्या वृत्तानुसार, रुग्णालयातील महत्त्वाची औषधे जसे की अँटीबायोटिक्स, कॅल्शियम गोळ्या, वेदनाशामक औषधे आणि मानसिक आरोग्य उपचारासाठी लागणारी औषधे रुग्णालयाच्या फार्मसीतून गायब झाली आहेत. त्यामुळे रुग्णांना ती औषधे बाहेरून खरेदी करावी लागत आहेत.




डीएन नगर येथील रहिवासी गिता शर्मा म्हणाल्या की, ''मी माज्या मुलासाठी अँटी-रेबिज लस घेण्यासाठी गेली होती. पण, डॉक्टरांनी सांगितले की लस उपलब्ध नाही. त्यांनी आम्हाला व्ही. एन. देसाई रुग्णालयात पाठवले.''

रुग्ण असेही सांगत आहेत की, रुग्णालयाच्या वॉर्डमध्ये औषधांच्या कमतरतेमुळे त्यांना हातमोजे, सुई खासगी स्टोअरमधून आणण्यास सांगितले जाते.

मानसिक रुग्णांवर याचा अधिक परिणाम झाला आहे. कारण महिन्याहून अधिक काळ औषधे उपलब्ध नाहीत. जुहू येथे राहणाऱ्या बाबर शेख यांनी सांगितले, की ''मी माझ्या भावाच्या मानसिक औषधांसाठी रुग्णालयात पुन्हा पुन्हा जात आहे, पण ते दरवेळी सांगतात की स्टॉक नाहीये.''

**रुग्णालयाने औषधांची कमतरता नाकारली**

रुग्णालयाशी संपर्क साधल्यावर, मुंबई महापालिका संचालिका आणि कूपर रुग्णालयाच्या कार्यवाहक प्रमुख डॉ. नीलम आंद्राडे यांनी औषधांची कमतरता असल्याचे आरोप नाकारले. त्यांनी सांगितले की, अशी कमतरता होणे अशक्य आहे आणि त्यांनी आरोपांची पुन्हा तपासणी करण्याची मागणी केली.

तथापि, कूपर रुग्णालयातील चालू संकटाने मुंबईतील महापालिका आरोग्य सेवांमधील वाढती दरी अधोरेखित करते.





## दिवाळीत बरसणार पाऊस... आयएमडीची काय आहे भविष्यवाणी

■**मुंबई । प्रतिनिधी,**

सप्टेंबरमध्ये झालेल्या मुसळधार पावसानंतर, महाराष्ट्रात पुन्हा वादळ आणि पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दिवाळीदरम्यान मुंबई महानगर प्रदेश सह राज्यातील अनेक भागात पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे.

सध्या, मुंबई आणि आसपासच्या भागात तेजस्वी सूर्यप्रकाश पडत आहे आणि लोक ''ऑक्टोबर उष्णतेने त्रस्त आहेत. हवामान अचानक बदलू शकते. आयएमडीनुसार, रविवारपासून तापमान कमी होण्यास सुरुवात होईल. सोमवार ते बुधवार संध्याकाळी मुंबई आणि त्याच्या आसपासच्या उपनगरांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.



**हवामान विभागाच्या मते, १८ ते २२ ऑक्टोबर दरम्यान कोकण तसेच दक्षिण मध्य महाराष्ट्रात आणि २१ आणि २२ ऑक्टोबर रोजी मराठवाड्यात विजांसह गडगडाटी वादळे होण्याची शक्यता आहे. २१ आणि २२ ऑक्टोबर रोजी विदर्भातही विजांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.**

भारतीय हवामान विभागाच्या (मते, अरबी समुद्रात तयार होणारे कमी दाबाचे क्षेत्र किनारी भागातील हवामानाच्या पद्धतींमध्ये बदल करू शकते. ही प्रणाली वायव्येकडे सरकत असताना अधिक सक्रिय होऊ शकते. याव्यतिरिक्त, दक्षिण अंदमान समुद्रावर चक्रीवादळ परिभ्रमण मंगळवारपर्यंत आग्नेय बंगालच्या उपसागरात एका नवीन दाब क्षेत्रात विकसित होऊ शकते.

यामुळे, केरळ, लक्षद्वीप, तामिळनाडू आणि पुदुचेरीमधील काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे. पुढील चार ते पाच दिवस महाराष्ट्राच्या काही भागात वादळ आणि विजांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने कोकण आणि मध्य महाराष्ट्रासाठी पिवळा इशारा जारी केला आहे.

## दिवाळीच्या रॉकेटमुळे ३ दुकाने जळून खाक... बोरिवलीमधील घटना

■**मुंबई । प्रतिनिधी,**

दिवाळीमध्ये फटाके जपून वापरण्याचा वारंवार सल्ला दिला जातो. रॉकेटसारखे फटाके उघड्या मैदानावर लोकवस्तीहून दूर वाजवण्याबद्दल अनेकदा सूचना दिल्या जातात. अशाच निष्काळजीपणातून बोरिवली येथे दुर्घटना घडली. बोरिवली पश्चिम येथील शिंपोली रोड परिसरात एक रॉकेट आरशांच्या दुकानावर पडले आणि मोठी आग लागली. या आगीत ३ शेजारील दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली, तर एका दुचाकीचेही नुकसान झाले. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.



आग लागल्यानंतर अग्निशमन दलाच्या गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या आणि काही तासांच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. तथापि, दुकानदारांना मोठ्या आर्थिक फटक्याचा सामना करावा लागला आहे.

आरशांच्या दुकानाचे मालक सुलतान खान यांनी सांगितले, ह्वआग लागल्यानंतर आमचा संपूर्ण स्टॉक जळून गेला. सुमारे सहा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. डिझायनर आरसे, साउंडप्रूफ पॅनेल्स आणि रंगीत काचेसह सर्व साहित्य जळाले.ह्व

त्यांनी पुढे सांगितले, ह्वस्थानिकांनी सांगितले की, एक रॉकेट आमच्या दुकानाच्या छतावर पडले होते. छत ताडपत्रीने झाकलेले होते, त्यामुळे ठिणगी लागून आग पसरली असावी. एका छोट्या रॉकेटमुळे इतकी मोठी हानी होईल, याची कल्पनाच नव्हती.ह्व

सणासुदीच्या काळात अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असून, प्रशासनाने नागरिकांना फटाके वापरताना काळजी घेण्याचे आणि सार्वजनिक ठिकाणी फटाके न फोडण्याचे आवाहन केले आहे.

## सोसायटीत खेळणाऱ्या मुलांवर जर्मन शेफर्ड सोडला...

### बचावासाठी मुलांची धडपड, हल्ल्यात एक अल्पवयीन जखमी

■**पिंपरी। प्रतिनिधी,**

पिंपरी-चिंचवडमधील सेक्टर १२, स्वराज्य नगरी परिसरात पाळीव जर्मन शेफर्ड श्वानाने एका लहान मुलावर हल्ला करून त्याला गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हा संपूर्ण प्रकार सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाला आहे.

श्वान मालक त्याचा जर्मन शेफर्ड प्रजातीचा श्वान घेऊन सोसायटी परिसरात आला होता. सोसायटीच्या परिसरात मुलं खेळत होती. तेव्हा अचानकपणे या श्वानाच्या गळ्यातील पट्टा मालकाच्या हातातून निसटला, या निष्काळजीपणानंतर बेफाम सुटलेल्या श्वानाने एका मुलावर हल्ला केला. या हल्ल्यात मुलगा अतिशय जखमी जखमी झाला आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर एकच खळबळ उडाली.

**कसा केला हल्ला?**

सदर घटना शनिवार १८ ऑक्टोबर 2025 रोजी घडली आहे. मुलं सोसायटीच्या परिसरात



क्रिकेट खेळत असताना श्वान मालक तिथून जात होता. यावेळी श्वानाने अचानक धाव घेत थेट एका अल्पवयीन मुलावर झडप घातली. हा प्रकार श्वानाच्या मालकासमोरच घडला असून त्याच्या निष्काळजीपणामुळे विशेषतः गळ्यातील पट्टा सुटल्याने ही घटना घडल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, व्हिडिओमध्ये दिसते आहे की, श्वानाच्या गळ्यात पट्टा नसलेला पाहून परिसरात खेळत असलेली मुलं घाबरुन गेली. त्यानंतर त्यांनी धावायला सरुवात केली. तर काहींनी आरडाओरडही केली. त्यानंतर श्वानाने एका मुलाचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. तो मुलगाही ओरडत पळायला लागला. यावेळी बेलगाम श्वानाने मुलाच्या पायाला चावा घेतला आणि मुलगा जमिनीवर खाली पडला. स्वतःच्या बचावासाठी मुलाने अनेक प्रयत्न केले. त्याने श्वानाला लाथेने दूर करायचा प्रयत्न केला. यावेळी सोसायटीत पार्क असलेल्या वाहनांनाही मलगा धडकल्याच या व्हिडिओत पाहायला मिळत आहे. दरम्यान, या घटनेनंतर सोसायटीतील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

बिल्डिंगमध्ये पाळीव प्राणी ठेवण्यास बंदी असतानाही काही रहिवाशांनी आक्रमक जातीचे श्वान पाळल्याने परिसरातील नागरिकांत भीती निर्माण झाली आहे. स्थानिकांनी महापालिका आणि पोलिस प्रशासनाकडे जबाबदार मालकावर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## दिवाळीच्या रात्री पुण्यात 'फायटर कोंबड्यांची' झुंज!

## पैशांची बाजी लावून जुगाराचा खेळ... पोलिसांनी ठोकल्या ६ जणांना बेड्या

■**पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यात दिवाळी म्हटलं की घराघरात आनंद, पण काही जण मात्र सणाचा चुकीचा अर्थ लावून बेकायदेशीर धंद्यांत गुंतलेले दिसत आहेत. अशाच एका प्रकारात वानवडी परिसरात पैशांवर फायटर कोंबड्यांची झुंज लावणाऱ्या सहा जणांना पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. ही झुंज म्हणजे काय तर जुगाराचा प्रकारच! कोंबड्यांना भिडवून त्यावर पैशांच्या बाज्या लावल्या जात होत्या.

वानवडी पोलिसांनाशनिवारी (१९ ऑक्टोबर) रात्री गुप्त माहिती मिळाली की 'इम्प्रेस गार्डन'च्या मागच्या मोकळ्या जागेत काही जण पैशावर कोंबड्यांचा खेळ चालवतात. ही माहिती लगेच तपास पथकाला देण्यात आली. दोन वेगवेगळे गट तयार करून पोलिसांनी जागेवर जाऊन खात्री केली, तर खरोखरच तिथे पाच-सहा इसम कोंबड्यांना भिडवत होते आणि बाजूला उभे राहून हार-जीत ठरवत पैसे टाकत होते.

क्षणाचाही विलंब न करता पोलिसांनी सापळा रचला आणि त्या ठिकाणी तातडीने छापा टाकला. सर्व सहा




आरोपी जागेवरच पोलिसांच्या हाती लागले. अमोल सदाशिव खुर्द (रा. रविवार पेठ), मंगेश आप्पा चव्हाण (रा. भवानी पेठ), निखिल मनिष त्रिभुवन (रा. घोरपडी), अमिर आयुब खान (रा. घोरपडीगाव), सचिन सदाशिव कांबळे (रा. भवानी पेठ) आणि प्रणेश गणेश पॅरम (रा. कॅम्प). या आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

या सर्वांकडून पोलिसांनी सहा रंगीत फायटर कोंबडे, त्यांना घेऊन जाण्यासाठी वापरलेल्या सहा पिशव्या, तीन मोटारसायकली, पाच मोबाईल फोन आणि २,५६७० रुपयांची रोकड असा एकूण ५ लाख ११ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. कोंबड्यांना झुंजीसाठी वापरताना त्यांना क्रूरपणे वागवलं जात असल्याचंही पोलिसांच्या लक्षात आले आहे.

या घटनेनंतर वानवडी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(ब) आणि प्राण्यांवरील क्रूरतेस प्रतिबंध करणारा कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व आरोपींना ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू आहे. सदर कारवाई ही अपर पोलीस आयुक्त (पूर्व विभाग). मनोज पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ 5 डॉ. राजकुमार शिंदे, आणि सहाय्यक पोलीस आयुक्त वानवडी विभाग धन्यकुमार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## परभणीत मित्रासमोर तरुणीवर सामूहिक अत्याचार, सहा जणांना अटक

■**परभणी। प्रतिनिधी,**

परभणी सर्वत्र दिवाळीची धामधूम असताना महाराष्ट्रात अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे.



मित्रासमोर तरुणीवर सामूहिक अत्याचार झाला आहे. या प्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली आहे. परभणीत ही खळबळजनक घटना घडली आहे.

परभणीच्या जिंतूर तालुक्यातील भोगाव परिसरातील इटोली शिवारात १८ वर्षीय तरुणीवर सामूहिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या घटनेला सहा दिवस उलटले असून जिंतूर पोलीस ठाण्यात सहा आरोपी विरुद्ध अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेनंतर पोलिसांनी जलद गतीने तपास करीत सहाच्या सहा आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी दिली.

या मध्ये एक आरोपी हा अल्पवयीन असल्याची माहिती आहे, १४ ऑक्टोबर रोजी एक तरुणी आणि तिच्या मित्रासोबत झाडाखाली गप्पा मारत बसले होते. त्यावेळी काही विकृत मनोवृत्तीच्या तरुणांनी त्यांना पकडत तरुणीवर अत्याचार केला. यावेळी तरुणीजवळ असलेली रोकड आणि इतर साहित्य देखील काढून घेतले. या घटनेने एकच खळबळ माजली आहे

## जालन्यात हळहळ... ऐन दिवाळीत ३ वर्षांच्या परीचा धक्कादायक मृत्यू, रस्त्यात बॉडी सापडली, कुटुंबाचा टाहो

■**जालना। प्रतिनिधी,**

प्रत्येक घराघरात दीपावलीची लगबग पाहायला मिळत असताना जालना शहरात आज एक मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. तीन वर्षीय मुलीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला. भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याने चिमुकलीचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

या घटनेविषयी सविस्तर माहिती अशी की जालना शहरातील जालना-अंबड राज्य महामार्गावर यशवंत नगर परिसरात तीन वर्षीय मुलीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला. परी दीपक गोस्वामी असं मयत मुलीचं नाव आहे. सकाळी ९ वाजताच्या सुमारास काही स्थानिक नागरिकांना हा प्रकार निदर्शनास आला. लेकीचा मृतदेह पाहून आई वडिलांनी एकच टाहो फोडला.

स्थानिकांनी तत्काळ घटनेची माहिती तालुका जालना पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलिस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झालं. तोपर्यंत ही माहिती जालना शहरात वाऱ्यासारखी पसरली होती. निष्पाप चिमुकलीसोबत कोणी काय केलं असेल, तिच्यासोबत घातपात झाला असेल का, ही चर्चा सर्वत्र सुरु होती.

पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलिस



अधिकारी अनंत कुलकर्णी, तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष साबळे यांनी तपासाची चक्रं फिरवत तात्काळ घटनास्थळी फॉरेन्सिक टीम पाठवली.

पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून तपास सुरु केला. प्रथमदर्शनी मुलीला भटक्या कुत्र्यांनी चावा घेऊन ठार केल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी परिसरातील सर्व सीसीटीव्ही छाननी सुरु केली आहे. मात्र ऐन दिवाळीत ही घटना घडल्याने संपूर्ण जालना शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

परीचे वडील एका कंपनीमध्ये इंजिनियर म्हणून काम करतात, तर आई गृहिणी आहे. तिला सहा वर्षांची मोठी बहीण सुद्धा आहे. या हसत्या खेळत्या परिवाराला कुणाची नजर लागली आणि होत्याचे नव्हते झालं, अशी हळहळ व्यक्त केली जात आहे.

या सर्व प्रकरणाचा शोध पोलीस घेत असून लवकरच योग्य माहिती समोर येईल, असे तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष साबळे यांनी सांगितले. जालना महापालिकेच्या हद्दीमध्ये मोकाट जनावरे, मोकाट कुत्रे यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

दोन ते तीन महिन्यापूर्वी गांधीनगर भागात सुद्धा असेच एका चिमुरडीचा मोकाट कुत्र्यांनी लोचके तोडत जीव घेतला होता, तर आणखी एका चिमुरडीला तोंड व नाकाला कुत्र्यांनी चावा घेतला होता. मात्र प्रसंगावधान राखत शेजाऱ्यांनी तिचा जीव वाचवला. मात्र परीचा जीव मात्र या मोकाट कुत्र्यांनी घेतल्यामुळे महापालिका प्रशासनाच्या कामावर जालना शहरातील नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# दिवाळीऐवजी दिवाळं निघालं...



**केंद्रातील कृषिमंत्री आणि देशाचे पंतप्रधान यांच्या पाहणी दौऱ्यासाठी महाराष्ट्रापेक्षा पंजाबसारखे राज्य जास्त भाग्यशाली ठरले. पण डबल इंजिनच्या सरकार असलेल्या महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या नशिबी ना कृषीमंत्री आले ना केंद्राचे पथक आले. ना ही पंतप्रधान दौरा झाला.**

राज्यातील शेतकऱ्यांची दिवाळी आता काळी होणार हे नक्की झाले आहे. कारण जवळपास १०० लाख हेक्टरवरील शेती आणि पिकांचे नुकसान झाले. लाखो पशुधन मरण पावले, वाहून गेले. मराठवाडा तसेच विदर्भात यवतमाळ, वाशीम, बुलढाणा तर पश्चिम महाराष्ट्रात अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यात अभूतपूर्व पूर संकटाने हजारो एकर जमिनी खरडून गेल्या. या जमिनी आता दुरुस्त होतील का आणि पुन्हा वहितीखाली येतील का याबाबत असंख्य शंका आहेत. लाखो कोटी टन सुपीक मातीचा थर नद्यामधून मोठ्या धरणात आणि काही ठिकाणी थेट समुद्रापर्यंत वाहून गेलाय. ही सुपीक माती कशी परत आणायची आणि जमीन पुन्हा लागवडीखाली कशी आणायची याचे कोणते ठोस नियोजन सरकार अद्याप करू शकले नाही. राज्याच्या आर्थिक क्षमतेच्या तुलनेने छोट्या असलेल्या पंजाबातल्या सरकारनेसुद्धा सरसकट किमान हेक्टरी ५० हजारांची मदत दिली. पण महाराष्ट्र सरकारची मदत या आकड्याचीही बरोबरी करणे तर दूरच त्याच्या जवळपासही नाही. केंद्रातील कृषिमंत्री आणि देशाचे पंतप्रधान यांच्या पाहणी दौऱ्यासाठी महाराष्ट्रापेक्षा पंजाबसारखे राज्य जास्त भाग्यशाली ठरले. पण डबल इंजिनच्या सरकार असलेल्या महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या नशिबी ना कृषीमंत्री आले ना केंद्राचे पथक आले. ना ही पंतप्रधान नरेंद्र मोदींचा दौरा झाला. दिवाळीआधी सरकारने शेतकऱ्यांना आर्थिक मदत करू, असे म्हटले होते. त्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेजही जाहीर केले. सरकारने आतापर्यंत २ हप्त्यात जेमतेम ५ हजार कोटी रुपये मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केली आहे. झालेले नुकसान आणि मिळालेली मदत याचे प्रमाण काढले तर हा आकडा २ ते ४ हजार रुपयांच्या पुढे जात नाही. हातची पिकं गेल्याने शेतकरी पुरता हतबल आहे. अशामध्ये सरकारच्या भिकेसारख्या दिलेल्या मदतीने शेतकरी पुरता हाताश आणि निराश झाला आहे. पिकांची, जनावरांची नुकसानीची मोजदाद सरकारने केली आहे, असे ते सांगत आहेत; पण अनेक ठिकाणी तलाठ्यांनी कृषी कर्मचाऱ्यांनी बांधावर न फिरता कार्यालयात बसूनच पंचनामे उरकले आहेत. प्रशासकीय अधिकारीसुद्धा सरकार उदासीन असल्याचे खासगीत सांगत आहेत. राज्यातल्या खरडून गेलेल्या जमिनींच्या नुकसानीचे खरेखुरी मोजदाद होणे गरजेचे आहे. वास्तविक ही मोजदाद केल्यानंतर सरकारला शेतीच्या इन्फ्रास्ट्रक्चरचे किती खोलवर नुकसान झाले आहे याचा अंदाज येईल. पण नेहमीच्या सोपस्कारात अडकलेले सरकार खरडलेल्या जमिनीबाबत ना गंभीर आहे ना कोणती कृती करत आहे. जमिनी खरपडून जाणे म्हणजे कायमस्वरूपी त्या जमिनीवर अवलंबून असणारा शेतकरी मजूर आणि व्यापारी यांचे अर्थकारण कायमचे बंद होणे. मराठवाड्यामध्ये धाराशिव, बीड, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी आणि पश्चिम महाराष्ट्रात अहिल्यानगर आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये शेती वाहून जाण्याचे ऐतिहासिक नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांना आता उपजीविकेसाठी शेती सोडून शहरात विस्थापित होण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. कारण त्यांना पुन्हा उभे करण्याचे कोणतेही नियोजन सरकारकडे अद्याप दिसत नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांच्या पुढे भविष्याचा काळोख दाटला आहे. ही झाली ज्यांचं नुकसान झाले आहे त्यांची स्थिती. ज्यांनी हे सर्व नुकसान सहन करूनसुद्धा आपली पिके वाचवली टिकवली त्या सर्वांची स्थिती आता मात्र युद्धात जिंकला आणि तहात हरला अशी झाली आहे. कापूस, सोयाबीन, मुग, उडीद यापैकी वाचलेली पीक आहेत. त्याची ऐन दिवाळीच्या तोंडावर व्यापाऱ्यांकडून खुली सुरू आहे. दिवाळी सुरू होऊनदेखील आतापर्यंत सरकारने कुठल्याही शेतमालाची खरेदी केंद्रे सुरू केलेली नाही ना त्याची घोषणा केली आहे. सरकारने फक्त कापसाच्या खरेदीची घोषणा केली आहे. आजच्या घडीला यापैकी कोणत्याही खरीपाच्या पिकाची हमी भावाने खरेदी सुरू नाही. सोयाबीनचा हमीभाव ५ हजार ३८० रुपये प्रति क्विंटल आहे. मात्र व्यापारी हे शेतक-यांना ३ हजार ४०० रुपये प्रतिक्विंटलचा भाव देत आहेत. प्रतिक्विंटल तब्बल दीड ते दोन हजार रुपयांची लूट सुरू आहे. पणन विभाग शेतकऱ्यांची लूट होत असताना मूग गिळून गप्प आहे. पणन विभागाला शेतकऱ्यांच्या लुटीचे गांभीर्य दिसत नाही. कापसाच्या बाबतीतही तेच सुरू आहे. मुग उडीद बेभाव विकले जाते आहे. कांद्याचे बेभाव खरेदीचे पुराण तर आठ महिन्यांपासून जास्त काळ सुरू आहे. वास्तविक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी पणन विभागाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. पण राज्याचा पणन विभाग आणि पणन मंत्री नरोवा कुंजरोच्या भूमिकेत दिसत आहेत. कर्जमाफी मागितली असता राज्याचे उपमुख्यमंत्री हे पैशाचे सोंग आणता येत नाही, असे सांगत आहेत. मग कोणी मागणी केली नसतानासुद्धा एक लाख कोटी रुपयांचा शक्तिपीठ महामार्ग मंजूर केला जातो त्यावेळी पैशाचे सोंग कुठून आणतात? इतके न समजण्यात का शेतकरी दूधखुळा नाहीये! शेतकऱ्यांना आता चांगलंच उमगलं आहे की हे सरकार त्यांच्या वेदना समजून घेणार नाही. ना नुकसानभरपाई देणार ना शेतमालाला योग्य हमीभाव देणार. हे सरकार फक्त मोठमोठी आश्वासने देण्यात आणि फुगवलेल्या आकड्यांत पॅकेज जाहीर करण्यात माहिर आहे; पण शेवटी शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या हाती येतो तो फक्त भोपळा! मोठ्या उद्योगपतींचं कर्ज माफ करायला हे सरकार क्षणाचाही विलंब करत नाही. कोट्यवधींच्या रकमा एकाच फटक्यात मंजूर होतात. पण ज्या शेतकऱ्याने घाम गाळून देशाचं पोट भरलं त्याने कर्जमाफी मागितली की सरकारला लगेच ''समित्या'' आठवतात. ''अभ्यासतज्ञ'' बसवले जातात आणि निर्णय पुढे ढकलला जातो. शेतकऱ्याच्या आयुष्याशी खेळणं हेच या सत्तेचं नवं राजकारण बनलं आहे. हे सरकार शेतकरीविरोधी आहे. हमीभावाचे आश्वासन पूर्ण करता न आल्यानेच सरकारने सन्माननिधी सारखी गोंडस योजना आणून ती लागू केली. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव पाहिजे आणि आजवर झालेल्या लुटीच्या बदल्यात कर्जमाफी पाहिजे. पण प्रत्यक्षात या दोन गोष्टी सोडून नको त्या सर्व गोष्टी सरकार शेतकऱ्यांना देऊ करते आणि म्हणूनच निराशेच्या गर्तेत सापडलेले शेतकरी आपली जीवन यात्रा संपवू लागले आहेत. महाराष्ट्रातल्या कृषी धोरण शून्य सरकारमुळेच आज राज्याचा शेतकरी आत्महत्या आणि कर्जबाजारीपणामध्ये देशात सगळ्यात पहिला क्रमांक लागतो आहे. आत्महत्यांचे आकडे सैरभैर करायला लावणारे आहेत. तर कर्जाचे आकडे शेतकऱ्यांची बाजारातली आणि समाजातली पत घालवणारे आहेत. देशात महाराष्ट्रातील सर्वाधिक जमीन ही उद्योग आणि रस्त्यांखाली जात आहे. शेती कमी होण्यात, शेतकरी मरण्यात आणि शेती कर्जबाजारी होण्यात महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. औद्योगिकरणात महाराष्ट्र पुढे असल्याचा दावा करणाऱ्या सरकारसाठी दुसरी आघाडी मात्र काळी कुट्ट झाली आहे. सरकार सारवासारव करण्यात दंग आहे. राज्याचे एक उपमुख्यमंत्री टीव्हीच्या कॅमे-यासमोर सफरचंदाची शेती करत आहेत. हे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचाच प्रकार असून यावरून सरकारमध्ये बसलेल्या लोकांची मानसिकताही कशी आहे याची चुणूक दिसते. शेतकरी, त्यांचे झालेले नुकसान, त्यांच्या मालाला मिळत नसलेला हमीभाव या सगळ्याची चिंता सोडून सरकारला फक्त निवडणुका कशा जिंकायच्या याची पडली आहे. ग्रामपंचायतपासून ते मुंबईचे महापालिकेपर्यंत मागच्या दाराने का होईना आपला पक्ष क्रमांक एकवर आणण्याची जणू स्पर्धा सुरू झाली आहे. पण यामध्ये शेतकरी दुर्लक्षित आहे भरडला जातोय आणि मरणाच्या दारात सहज पोचवून दिला जातोय हेच महाराष्ट्रातले दिवाळीच्या तोंडावरील शेतीचे आणि शेती आधारित अर्थकारणाचे आजचे वास्तव आहे.

# ठाण्यात महायुतीत फाटाफूट

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महायुतीने ठाणे जिल्ह्यात घवघवीत यश मिळविले असले तरी आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीच्या घटक पक्षांमध्ये कमालीची नाराजी पहायला मिळत आहे. त्यामुळेच की काय ठाणे जिल्ह्यातील भाजप-शिवसेनेच्या नेत्यांमध्ये स्वबळाची भाषा पुन्हा एकदा उचल खाऊ लागली आहे. कालच्या भाजप-शिवसेना पदाधिकार्यांच्या बैठकीत याचाच प्रत्यय आला. ठाण्याच्या आनंद आश्रमात गुरुवारी सायंकाळी शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांच्या उपस्थितीत शिवसेनेचे पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत संघटनात्मक बांधणी आणि पालिका निवडणुकीच्या पूर्वतयारीवर चर्चा करण्यात आली. तर अशाच प्रकारे भाजप आमदार संजय केळकर, निरंजन डावखरे, भाजपचे नेते संदीप लेले यांनी भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांची ठाण्यातच बैठक घेतली. या दोन्ही बैठकीतील नेते, पदाधिकार्यांनी महापालिका निवडणुकीसाठी आपल्याला युतीची गरज नसल्याचा सूर लावला. एवढेच नाही तर दोन्ही पक्षांच्या पदाधिकार्यांनी यंदा ठाणे जिल्ह्यातील महापालिकांमध्ये आपलाच महापौर बसेल असा नारा देत परस्परांना उकसवण्याचाही प्रयत्न केला.

मुंबईला लागून असलेला ठाणे जिल्हा हा राजकीय दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील जिल्हा मानला जातो. ठाणेकरांच्या पाठिंब्याच्या जोरावर शिवसेनेने पहिल्यांदाच सत्तापदाची चव चाखली होती. त्यानंतर हळूहळू शिवसेनेचा विस्तार राज्यभर झाला. इतर जिल्ह्यांमध्ये कधी सत्ता आली, कधी गेली. परंतु शिवसेनेने अगदी पहिल्यापासून ठाण्यावर पूर्णतः नियंत्रण ठेवले. शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ठाण्यातलेच. शिवसेनेतील फुटीनंतर एकनाथ शिंदे यांनी अत्यंत चलाखीने ठाणे जिल्ह्यातले नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची फौज आपल्यापाठी उभी करून साम-दाम-दंड-भेद असे सारे कसब पणाला लावून ठाणे जिल्हा आपल्याच नियंत्रणाखाली ठेवला. शिवसेना ठाकरे गटाच्या ताब्यातील एक-एक शाखा हिसकावून घेण्यासाठी त्यांनी स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांना पूर्ण ताकद पुरवली. अर्थात ज्यावेळी या सार्या घडामोडी घडत होत्या, तेव्हा एकनाथ शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री होते. पण आता परिस्थिती पालटली आहे. नव्या महायुती सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असलेल्या एकनाथ शिंदे यांचीच डाळ शिजत नसल्याचे चित्र आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडे गृहनिर्माण आणि नगरविकास खाते आहे. परंतु त्यांनी मंजूर केलेले प्रकल्प, फायली मुख्यमंत्र्यांच्या टेबलापाशी जाऊन रेंगाळत असल्याचे म्हटले जाते, शिवसेनेच्या इतर मंत्र्यांची अशीच अवस्था असल्याने महायुती सरकारमध्ये एकनाथ शिंदे यांची सर्वच बाजूंनी कोंडी करण्याचे प्रयत्न भाजपने चालवले असल्याचे दिसते.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना ठाण्यात रवींद्र चव्हाण भाजपची जबाबदारी सांभाळायचे. तेव्हाही भाजप-शिवसेनेत विकासकामे आणि इतर प्रश्नांवरून हमखास टक्कर व्हायची. आता तर रवींद्र चव्हाण भाजपचे प्रदेशाध्यक्ष झालेत. जोडीला वनमंत्री गणेश नाईकही नवी मुंबईची हद्द ओलांडून वारंवार ठाणे जिल्ह्यात धडका देऊ लागलेत. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकांमध्ये अधिकाऱ्यांना निर्देश देणे, भाजपच्या पदाधिकाऱ्यांना हव्या त्या प्रकारे विकासकामे करू देणे, त्यासाठी निधीची तरतूद करणे आणि जमेल तेथे शिवसेनेचे नेते, पदाधिकाऱ्यांना डावलणे किंवा त्यांच्या कामात अडथळे निर्माण करणे



अशी रणनीती मागच्या काही महिन्यांपासून अवलंबली जात आहे. अर्थात या सर्वांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा भरभक्कम पाठिंबा मिळत असल्यानेच ठाणे जिल्ह्यात भाजपचा जोर वाढू लागला आहे. परिणामी शिवसेनेचे स्थानिक नेते, पदाधिकारी, कार्यकतेर्ही चांगलेच हैराण आहेत. म्हणूनच या दोन्ही पक्षांचे पदाधिकारी एकमेकांसमोर आले की धुसफूस सुरू झालीच म्हणून समजा. अगदी काही दिवसांपूर्वीच प्रभाग रचनेतील मनमानीवरून गणेश नाईक यांनी एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे तक्रार केल्याची चर्चा रंगली होती. या सर्व घडामोडी अत्यंत नियोजनबद्ध रितीने आणि जाणीवपूर्वक घडवून आणल्या जात आहेत आणि यामागे अर्थातच ठाणे जिल्ह्यावर नियंत्रण मिळवणे हाच भाजपचा एकमात्र उद्देश असल्याचे दिसते.

मागच्या पाच वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. जिल्ह्यातील सर्वच महापालिकांमध्ये प्रशासकराज आहे. मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांच्या इशाऱ्याने या सर्व प्रशासकांमार्फत कामे करवून घेतली जातात. कुठल्या परिसरात विकासकामे करायची, कुठे निधी उपलब्ध करून द्यायचा, कुठे नाही यामध्ये जबरदस्त राजकारण सुरू आहे. मुंबई महापालिकेनंतर ठाणे जिल्ह्यातल्या महापालिका अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. ठाणे महापालिका, कल्याण-डोंबिवली महापालिका, नवी मुंबई महापालिका, मीरा-भाईंदर महापालिका, उल्हासनगर महापालिका, भिवंडी-निझामपूर महापालिका त्याशिवाय अंबरनाथ नगरपालिका, कुळगाव-बदलापूर नगरपालिकांमध्ये कमी अधिक प्रमाणात शिवसेना-भाजपचाच वरचष्मा आहे. गणेश नाईक राष्ट्रवादीत असताना नवी मुंबईतील समीकरणे वेगळी होती, परंतु ते आता भाजपात गेल्यामुळे तिथे भाजपला पक्ष पातळीवर मजबुती मिळाली आहे. इतर ठिकाणी दोन्ही पक्षांमध्ये कॉंटे की टक्कर अशीच परिस्थिती आहे. मुंबई महानगर प्रदेशात येणाऱ्या महापालिका क्षेत्रांमध्ये जोरदार नागरीकरण सुरू आहे. पायाभूत सुविधा प्रकल्प, बांधकाम प्रकल्प, उद्योगधंद्यांचीही भरभराट सुरू आहे. कोट्यवधींच्या उलाढाली होत आहेत, कंत्राटे-कामांच्या देवाणघेवाणी सुरू आहेत. अशा सर्व परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्याने एकमेकांवर मात करण्यासाठी दोन्ही पक्ष संधी सोडतील असे वाटत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच एका मुलाखतीत जमेल तिथे युती नाही तर स्वबळावर निवडणुका लढण्याचे संकेत दिले होते. शिवसेना-भाजपमधून आधीच विस्तव जात नसताना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या निमित्ताने महायुतीत फाटाफूट होण्याची दाट शक्यता आहे.

# तत्त्वमसि!

पूर्ण भगवद्गीता तीन शब्दांत सांगायची असेल, तर ते महावाक्य आहे 'तत्वमसि!' 'तत्', 'त्वम्' आणि 'असि' असे ते तीन शब्द आहेत. भगवद्गीतेत एकूण १८ अध्याय आहेत. शास्त्रकारांनी सहा सहा अध्यायांच्या तीन भागांत गीता विभागली आहे. पहिले सहा अध्याय हे प्रथम षट्क, अध्याय सात ते १२ मध्यम षट्क आणि अध्याय १३ ते १८ चरम षट्क अशी रचना आहे. प्रथम षट्कात, पहिल्या सहा अध्यायांत भगवान श्रीकृष्ण 'त्वम्' या शब्दाचा विस्तार करतात. येथे कर्मयोग सांगितला आहे. येथे मनुष्याच्या प्रयत्नांवर जोर दिलेला दिसतो. येथे चार बाबींचा उल्लेख आहे - जीवाचे स्वरूप, 'त्वम्' पदाचे शोधन, कर्मयोगाची साधना आणि मनुष्य (पुरुष) प्रयत्न. मध्यम षट्कात ईश्वराच्या स्वरूपाचे विस्तृत वर्णन केलेले दिसते. 'तत्' या पदाचा शोध आहे. यात उपासना योग, म्हणजेच भक्तीयोग सांगितला आहे. यात विशेष करून ईश्वरीय अनुकंपेवर भाष्य आहे. परमेश्वर कृपा प्राप्त करण्याचे मार्ग, त्याची साधने, ती प्राप्त करण्याचा लाभ व त्याचे परिणाम यांवर त्यात विस्ताराने भाष्य केलेले आहे. परमेश्वराची कृपा सतत असणार आहे आणि ती सदैव असतेच; परंतु आज प्रार्थना केली आणि कृपा झाली, असे होत नाही. त्यातील परमशक्ती प्राप्त करून घेणे, हे आपले काम आहे. ते आपली भक्ती आणि उपासना कशी आहे, यावर अवलंबून आहे, असे त्यात सांगितले आहे. चरम षट्कात 'जीवेश्वर ऐक्यम्' - जीव आणि ईश्वर एकच आहेत, ते भिन्न नाहीत, हे सांगितले आहे. यात 'असि'पदाचे शोधन आहे. येथे ज्ञानयोगाची चर्चा आहे.

**एखाद्या घटनेची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली की,त्याला हल्ली सोशल मीडिया ट्रेन्ड म्हणतात. काही दिवसांपासून इन्स्टाग्राम, फेसबुक, युट्युब यासारख्या सोशल मीडिया माध्यमांवर महत्वाचा विषय ट्रेन्ड होतोय,तो म्हणजे,भारतीय नागरिकांचा सिविक सेन्स. म्हणजेच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, वाहतुकीचे नियम, इतर नियम पाळण्याची भारतीयांची मानसिकता. या विषयावर मोठ्या प्रमाणात विदेशी सोशल मीडियावर चर्चा चालू आहे. विदेशी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर भारतीयांच्या या सिविक सेन्सवर म्हणजेच नागरी शिस्तीवर मोठ्या प्रमाणात टीका करताना दिसत आहेत. तसे व्हिडीओदेखील समोर येत आहेत.**



# भारतीयांच्या सार्वजनिक बेशिस्तीचे जागतिक धिंडवडे!

मुळात परदेशात जाणारा प्रत्येक व्यक्ती हा तो ज्या देशातून जातो, त्या देशाचं प्रतिनिधित्व करत असतो. त्याने कोणतीही चांगली बाब केली तरी देशाचं नाव मोठ होतं आणि त्याने कोणतीही चुकीची गोष्ट घडली की देशाचंच नाव पुढे येणार. हेच भारतीयांच्या सिविक सेन्सबाबत होताना दिसत आहे. याचा अर्थ एका देशातील सर्वांनाच सिविक सेन्स नसतो असा नाही. परंतु, बहुसंख्य नागरिकांना सिविक सेन्स नसला की, त्याचे समाजात, देशात प्रतिबिंब दिसू लागतं. मग ते रस्त्यावर, रेल्वे बसस्थानकांच्या कोर्पयात, ट्रॅफिक सिग्नलवर दिसतं. मग हा सिविक सेन्स ट्रेन्ड किती खरा आहे, हे देखील पटतं.

या सिविक सेन्स ट्रेन्डबाबतच्या व्हिडीओजमध्ये नेमकं आहे काय? तर या बऱ्याचशा व्हिडीओजमधील एका व्हिडीओमध्ये एक भारतीय नागरिक न्यूझीलंडमध्ये एका स्वच्छ स्विमिंग पूलमध्ये साबण लावून अंघोळ करताना दिसत आहे. दुसऱ्या व्हायरल व्हिडीओमध्ये एक तरूणी विदेशात मेट्रोमध्ये जेवताना दिसत आहे. अजून एका व्हिडीओमध्ये काही जण बुर्ज खलिफामध्ये नाचताना दिसत आहेत. असे अनेक व्हिडीओ भारतीयांचा सिविक सेन्स या नावाने व्हायरल होताना दिसत आहेत. आजच्या सोशल मीडियाच्या जगात व्हायरल होणारे व्हिडीओ किती चूक आणि बरोबर यात पडणं योग्य ठरणार नाही, पण देशात बहुसंख्य नागरिकांना सिविक सेन्स कमी आहे, हे देशातील एकंदरित परिस्थिती पाहून दिसत आहे. याचा ना धर्म, जात, प्रांत कशाशीही संबंध नाही. धर्म, जात, प्रांतांनी विभागलेले अनेक बहुसंख्याक भारतीय नागरिक सिविक सेन्सच्या बाबतीत मात्र एकमेकांशी साधर्म्य साधताना दिसत आहेत.

याची प्रचिती रस्त्यावर, रेल्वे स्थानकांवर येते. देशातील बहुतांश शहरांमध्ये ट्राफिक सिग्नल, रेल्वे, विमानतळांवर लागणार्या रांगा किती शिस्तीत असतात? या प्रश्नांची उत्तरं तात्काळ मिळतात. स्वच्छतेच्या बाबतीत तर भारतासारखा मोठा आणि प्राचीन सांस्कृतिक वारसा लाभलेल्या देशाची परिस्थिती दिवसेंदिवस खालवत चाललेली आहे. रेल्वे स्थानकांवर प्लॅटफॉर्म, पूल यांच्यावर थुंकून साचलेले गुटख्याचे थर बहुसंख्य समाजाची मानसिकता आणि सवय अधोरेखीत करतात. हल्लीच मुंबईच्या जवळील मिरा-भाईंदर खाडीमध्ये लोकलमधील एका प्रवाशाने निर्माल्याचा नारळ भिरकावला. त्यात हा नारळ लागून एका तरूणाचा मृत्यू झाला. माणसाकडून पर्यावरणाला हानी पोहोचत आहेच, शिवाय असे सामाजिक भान नसल्यामुळे माणसासाठी माणूसच दिवसेंदिवस घातक बनत चालला आहे.

या अस्वच्छतेमध्ये ज्या गुटखा इंडस्ट्रीचा मोठा हात आहे, त्या पान मसाला मार्केटचा धंदा कोट्यवधींची उड्डाणे घेत आहेत. संपूर्ण जगात आपला भारत देश पान मसाल्याची देशाबाहेर विक्री करण्यात एक नंबरवर आहे. एका अहवालानुसार २०२१ साली जवळपास ४१ हजार कोटींचे हे पान मसाला मार्केट होते. कदाचित आता त्याहूनही अधिक असेल. याच्या तुलनेत चॉकलेट मार्केट फक्त १६ हजार कोटींचे आणि बिस्कीट मार्केट ३७ हजार कोटींचे आहे. विशेष म्हणजे देशभक्तीचे संदेश देणारे अनेक सुपरस्टार या पान मसाला उत्पादनांची कमीत कमी १० कोटी रुपये घेऊन जाहिरात करतात. या अर्पुया सिविक सेन्सचा परिणाम असा की, आतापर्यंत कोविडने भारतामध्ये ५ लाखांहून अधिक लोकांचा जीव घेतला, परंतु असा अजून एक आजार आहे, जो वषार्ला ५ लाख लोकांचे जीव घेतो.

विशेष म्हणजे हा मृतांचा आकडा दरवर्षी तेवढाच असतो. तो आजार म्हणजे टीबी. विशेष म्हणजे संपूर्ण जगापैकी टीबीच्या एक तृतीयांश केसेस फक्त भारतात आढळतात. इतर आजार वेगळे. याला कारण काय तर आपला अपुरा सिविक सेन्स. एक पान मसाला खाणारा माणूस १० मिनिटांत सरासरी २० ते ३० वेळा थुंकतो आणि आपल्या थुंकीद्वारे आजार पसरवत असतो. ज्याचे प्रमाण आपल्या देशात सर्वाधिक आहे. आकडेवारीनुसार जवळपास १२०० कोटी रुपये भारतीय रेल्वे फक्त थुंकी साफ करण्यासाठी खर्च करते, परंतु या खचार्चा उपयोग झालेला दिसत नाही. कारण थुंकणारे थांबत नाहीत.

हा झाला सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याबाबतचा सेन्स. वाहतुकीच्या नियमांबाबतही आपल्या देशात स्थिती खराब आहे. अगदी शहर आणि ग्रामीण भागातही तीच स्थिती. वाहतुकीचे नियम न पाळल्याने अनेकांना आतापर्यंत जीव गमवावा लागला आहे. सिग्नल न पाळणे, कारणाशिवाय हॉर्न वाजवणे असले प्रकार आपल्या देशात सर्रास पाहायला मिळत आहेत. विदेशात बहुसंख्य ठिकाणी ट्राफीक नियम अगदी कोटेकोरपणे पाळले जातात.अमेरिकेसारख्या देशामध्ये तर हॉर्न वाजवणे हे असभ्यपणाचे लक्षण मानलं जातं.शिवाय तिथे नियमदेखील तितकेच कठोर आहेत.

देशाप्रती बहुसंख्य समाजाने जबाबदारीने न वागण्याचा फटका देशातील धार्मिकदृष्ट्या महत्वाच्या मानल्या जार्णाया गंगा नदीलादेखील मोठ्या प्रमाणात बसला आहे. गंगा नदीच्या काठावर मोठी शहरे असल्याने, प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट नदीत सोडले जाते. तसेच, मृतदेह अर्धे जाळून किंवा न जाळता नदीत विसर्जित करण्याची धार्मिक प्रथा देखील प्रदूषणात भर घालते. अनेक कारखान्यांमधून विषारी औद्योगिक सांडपाणी गंगेत सोडले जाते, ज्यामध्ये शिसे आणि तांबे यांसारखे जड धातू असतात. औद्योगिक कचरा एकूण प्रदूषणपैकी सुमारे १२ टक्के असतो. दुसरीकडे यमुना नदीतील प्रदूषणाचे सर्वात मोठे कारण सांडपाणी आहे. सुमारे ५८ टक्के कचरा नदीत टाकला जातो आणि यातील बहुतांश कचरा दिल्लीतून येतो.

दिल्लीत दररोज ३२७ कोटी लिटर सांडपाणी तयार होते, जे नदीत सोडले जाते. यामुळे जलचरांचा मोठ्या प्रमाणावर मृत्यू झाला आहे. अनेक प्रयत्न करूनही, दिल्लीतून वाहणार्या २२ किलोमीटरच्या पट्ट्यात जवळपास ८० टक्के प्रदूषण होते. गंगा नदीचे प्रदूषण कमी करणे, संवर्धन करणे आणि पुनरुज्जीवन करणे या दुहेरी उद्दिष्टांसह केंद्र सरकारने जून २०१४ मध्ये २०,००० कोटी रुपयांच्या बजेटसह एकात्मिक संवर्धन अभियान सुरू केले होते.परंतु, तरी देखील नागरी भान न पाळणार्या बहुसंख्य समाजाच्या मानसिकतेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाला नाही. त्यामुळे अशी अभियाने म्हणावी इतकी सफल झालेली नाहीत.

१९४७ साली आपला भारत देश स्वतंत्र झाला. ब्रिटीश सत्तेपासून अगदी मुक्त. या सुवर्णक्षणांना आता ७८ वर्षे उलटली. तरी बहुसंख्य नागरिकांमध्ये समाजाप्रती असलेली जबाबदारीची भावना वाढीस लागली की, कमी झाली? हादेखील मोठा प्रश्न आहे. युरोप, यूएसए, जपान, चीन, रशिया यांसारख्या देशांतील नागरिकांसारखा सिविक सेन्स आपल्या इथे रूजण्यास इतका उशीर का लागतोय, हा देखील संशोधनाचा विषय नक्कीच आहे. महात्मा गांधींचे स्वच्छतेचे धडे सांगतात की स्वच्छता ही केवळ एक कर्तव्य नसून ती एक नैतिक जबाबदारी आहे. ती ईश्वरभक्तीच्याही पुढे आहे. त्यांनी लोकांना स्वतःच्या स्वच्छतेची काळजी घेण्यासाठी आणि इतरांनाही तसे करण्यास शिकवण्यासाठी 'ना मी कचरा टाकणार, ना इतरांना कचरा टाकू देणार' अशी प्रतिज्ञा घेण्यास सांगितले. गांधीजींच्या मते, स्वच्छतेच्या अभावामुळे अनेक रोग आणि सामाजिक समस्या निर्माण होतात, त्यामुळे त्यांनी स्वतःच्या कृतीतून हा धडा घालून दिला. या सर्व शिकवणी समाजहिताच्या आणि सिविक सेन्सच्या संबंधित नक्कीच होत्या.परंतु,अशी शिकवण देशातील बहुसंख्य नागरिकांनी अंगीकारलेली नाही, हेच चित्र आहे. इतकी वर्षे सत्तेत येणार्या सत्ताधार्यांनी आपल्या परीने स्वच्छतेबाबत जनजागृती करत स्वच्छता पंधरवडासारखे अभियान राबवले. परंतु,अशा अभियानांचा म्हणावा तितका परिणाम होताना दिसत नाही. थेट रस्त्यावर नागरिकांच्या वागण्यात दिसत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

सोशल मीडियावर विदेशी नागरिकांकडून सिविक सेन्सबाबत भारतीय समाज ट्रोल होताना दिसत आहे. अनेकांना याबाबच मनापासून वाईटदेखील वाटत असेल, पण त्यांना वस्तुस्थिती माहिती आहे. मुळात अनेक विदेशी नागरिक देखील भारत देशातील नद्यांचे प्रदूषण, प्लास्टिक समस्या आपल्या सोशल मीडियावर मांडत आहेत. त्यांची स्तुती करावी तेवढी थोडीच. त्यामुळे विदेशामध्ये इंडियन्सचा सिविक सेन्स हा टॉपिक ट्रेंडिंग होत आहे. तरी येथील शिक्षितांनी देशात जास्तीत जास्त नागरिकांचा सिविक सेन्स कसा चांगला होईल, याचा प्रयत्न करायला हवा. आपल्या घरासोबत सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता ठेवायला हवी. बहुसंख्य नागरिक समाजाप्रती कसा जागरूक होईल याचा प्रयत्न करणे आवश्यक बनले आहे.

स्वातंत्र्यानंतर कित्येक सरकारांनी यासाठी अभियानांच्या माध्यमातून प्रयत्न केले असले तरी,आता अगदी लहान वयातच मुलांच्या पालकांनी, शिक्षकांनी याची जबाबदारी घेतली पाहिजे. त्यासाठी घरापासून अगदी शालेय स्तरावर सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे. सामाजिक जबाबदार्यांबाबत सतत मार्गदर्शन शिबीरे, तसे कार्यक्रम शिक्षक, पालक आणि मुलांच्या सहभागाने प्राधान्याने होणे गरजेचे आहे. तरच सोशल मीडियावर भारतीयांच्या सिविक सेन्सवरून दाखवले जाणारे व्हिडीओ आणि देशातील खरी वस्तुस्थिती आगामी काळात भिन्न असेल.

# रात्री झोपण्यापूर्वी करा या ३ गोष्टी, लक्ष्मीला येण्याचे आमंत्रण द्या... घर संपत्तीने भरले जाईल

**ऐश्वर्य आणि धनाची देवी लक्ष्मीला प्रसन्न करण्याचा महान सण दिवाळी जवळ येत आहे. आश्विन महिन्यातील अमावास्येला हा उत्सव साजरा केला जातो.**

दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर देवी लक्ष्मीची विशेष आराधना केली जाते, जेणेकरून तिचा आशीर्वाद कुटुंबावर राहतो आणि सौभाग्य आणि समृद्धी वाढत राहते. वास्तुनसार दिवाळीच्या आधीपासूनच जी लोक आपल्या घराची साफसफाई करण्यास सुरवात करतात त्यांच्या घराकडे लक्ष्मी आकर्षित होते, कारण स्वच्छतेमध्येच लक्ष्मीचा वास असतो. तसेच दिवाळीपर्यंत रात्री झोपण्यापूर्वी असे काही काम करावे, जे देवी लक्ष्मीला घरी येण्याचे आमंत्रण देणारे मानले जाते.



दिवाळीला देवी लक्ष्मीला आमंत्रणे पाठवा

हिंदू धर्मग्रंथानुसार रात्री झोपण्यापूर्वी काही गोष्टी नेहमी लक्षात ठेवाव्यात. या गोष्टींची काळजी घेतल्यास घरात आर्थिक समस्या कधीच उद्भवत नाहीत. हे दिवाळीपूर्वी केले पाहिजे. असे मानले जाते की संपूर्ण कुटुंबासाठी रात्री झोपण्यापूर्वी 3 गोष्टी करणे केव्हाही चांगले असते आणि कधीही पैशाची समस्या येत नाही. चला जाणून घेऊया, ही कोणती 3 कामे आहेत, जी देवी लक्ष्मीला घरी येण्याचे आमंत्रण देण्यासारखे मानले जातात.

माता लक्ष्मीला स्वच्छता खूप आवडते. झोपण्यापूर्वी मुख्य दारावर कचरा किंवा पसारा नसावा. परिसर स्वच्छ करावा. त्याचप्रमाणे सकाळच्या पूजेमध्ये वापरलेली फुले रात्री उशिरापर्यंत पूजा कक्षात ठेवू नका, ती काढून टाकावीत.

संध्याकाळची आरती झाल्यावर अर्ध्या तासाने कलश स्वच्छ पाण्याने भरा. पूजा खोलीत कलश किंवा पाण्याचे भांडे कधीही पाण्याशिवाय ठेवू नये.

रात्री झोपण्यापूर्वी कापूरमध्ये लवंग मिसळून संपूर्ण घरात धूर करावा. असे मानले जाते की असे केल्याने घरातील नकारात्मकता निघून जाईल आणि संपत्तीत भरघोस वाढ होईल.

असे मानले जाते की जर एखाद्या व्यक्तीने ही कामे नियमितपणे आणि भक्तिभावाने केली तर घरामध्ये आशीर्वाद प्राप्त होतात. देवी लक्ष्मी आणि अन्नपूर्णा यांच्या कृपेने आर्थिक अडचणी येत नाहीत. कुटुंबात नेहमी आनंद असतो. घरात सुख-शांती नांदते. त्याचबरोबर दिवाळीपर्यंत रोज हे काम केल्याने देवी लक्ष्मीला घरात येण्याचे आमंत्रण दिले जाते.

# लक्ष्मीला प्रसन्न करण्यासाठी वास्तुनुसार दारावर लावा तोरण

**सनातन धर्मात भगवान गणेश आणि देवी महालक्ष्मीच्या आनंदाचा सण म्हणजे आश्विन अमावास्येला ला साजारा होणार सण दिवाळी. भगवान श्री विष्णूंच्या प्रिय असणाऱ्या महालक्ष्मीच्या स्वागतासाठीची तयारी बऱ्याच दिवसा पूर्वी सुरू होते. घर आणि व्यावसायिक संस्थान, कार्यालयाची स्वच्छता, रंग-रंगोटी केली जाते. त्या नंतर आपल्या घराला सजविण्याचे काम सुरू होते. दिवाळीवर देवी लक्ष्मीच्या स्वागतासाठी विविध प्रकाराचे तोरण मुख्य दारावर लावले जातात. जर आपण वास्तुच्या काही नियमांना लक्षात ठेवून रंग आणि दिशेनुसार तोरण बांधले, तर ते आपल्याला शुभ आणि चांगली फळ देतात आणि आनंद, यश आणि समृद्धी आपल्या जीवनात दार ठोठावते.**

- **तोरणाने आनंद येईल –** मुख्य दारावर बांधल्या जाणाऱ्या तोरणाला बंधनवार असे ही म्हणतात. देवी लक्ष्मीच्या स्वागतासाठी आणि देवी आईला प्रसन्न करण्यासाठी दारावर हे बांधणे शुभ मानतात. हे बांधल्याने घरात सकारात्मक ऊर्जा येते. तोरण आपण ताज्या फुलांचे, प्लॅस्टिकच्या फुलांचे किंवा धातूचे देखील बनवू शकता. आजकाल बाजारपेठेत वेगवेगळ्या रंगाचे आणि डिझाइनचे तोरण मिळतात. तोरणांची निवड घराच्या दिशेनुसार, रंग आणि आकार लक्षात घेऊन लावल्याने नशीब वाढतं.
- **पूर्वीकडे घराचे मुख्य दार असल्यास –** जर आपल्या घराचे दार पूर्वमुखी असल्यास तर हिरव्या रंगाचे फुलांचे आणि पानाचे तोरण लावणं सुख आणि समृद्धीला आमंत्रण देत. या दिशेत ताज्या आंब्याच्या आणि अशोकाच्या पानाचे तोरण लावल्यानं सकारात्मक ऊजेर्चा संचार होतो आणि लक्ष्मीची कृपा मिळते.
- **उत्तरेकडे घराचे मुख्य दार असल्यास –** धनाची दिशा उत्तरेच्या मुख्य दारासाठी निळे किंवा आकाशी रंगांच्या फुलांचे तोरण लावावे. जर आपल्याकडे ताजे फुले नसल्यास आपण प्लस्टिकच्या फुलांचा वापर करू शकता. पण लक्षात ठेवा की फुले आणि पाने तुटलेले किंवा घाणेरडे नसावे. हे नेहमीच नकारात्मकता वाढवतात.
- **दक्षिणेकडे घराचे मुख्य दार असल्यास –** जर घराचे मुख्य प्रवेश दार दक्षिणेकडे असल्यास तर लाल, नारंगी किंवा याचा सम रंगाने असलेले तोरण बांधावे. असे केल्याने घरात धनागमन होत आणि मान सन्मानात वाढ होते.
- **पश्चिमेकडे घराचे मुख्य दार असल्यास –** घराचे मुख्य दार पश्चिमेकडे असल्यास मुख्य दारासाठी पिवळे, सोनेरी किंवा फिकट निळ्या रंगाच्या फुलांचे तोरण दारावर लावणं लाभ आणि प्रगतीस मदत करतं. लक्षात ठेवा की पूर्वी आणि दक्षिणे कडे असणाऱ्या दारावर कोणत्याही धातूचे तोरण लावू नये. पश्चिम आणि उत्तरे कडील दारावर धातूंचे तोरण लावू शकतो. अशा प्रकारे उत्तर, पूर्व आणि दक्षिण दिशेत बनलेल्या प्रवेश दारावर लाकडाचे तोरण लावू शकतो, पण पश्चिम दिशेला लाकडाचे तोरण लावणे टाळावे.






## लक्ष्मीपूजन २१ ऑक्टोबर रोजी का करावे?

# संभ्रम असला तर नक्की वाचा निर्णय घेणे सोपे होईल

महाराष्ट्रातील अतिशय लोकप्रिय दिनदर्शिका कालनिणर्य यात दिलेल्या माहितीनुसार या वर्षी शक १९४७ मध्ये २० ऑक्टोबर २०२५ रोजी सोमवारी चतुर्दशी समाप्ती ०३.४४ वाजता असून त्यानंतर अमावस्या सुरु होत आहे आणि दुसऱ्या दिवशी २१ ऑक्टोबर रोजी मंगळवारी सायंकाळी ०५.५४ वाजता अमावस्या समाप्ती आहे. २० ऑक्टोबर रोजी प्रदोषकाळात अमावस्या असून दुसऱ्या दिवशी २१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी अमावस्या असलेल्या दिवशी धर्मसिंधु, पुरुषार्थ चिंतामणि, तिथिनिर्णय इ. ग्रंथांमधील वचनांचा विचार करुन २१ ऑक्टोबर रोजी मंगळवारी लक्ष्मीपूजन दिलेले आहे.

"पूर्वत्रैवव्याप्तिरितिपक्षे परत्रायमत्र याधिकव्यापिदर्शापेक्षया प्रतिपद्वद्धिसत्त्वेलक्ष्मीपूजादिकम पिपरत्रैवेत्युक्तम्। (धर्मसिंधु, पुरुषार्थ चिंतामणि)

अर्थात पूर्व दिवशी प्रदोषव्याप्ति असून दुसऱ्या दिवशी तीन प्रहारापेक्षा अधिक अमावास्याव्याप्ति असेल आणि अमावास्येपेक्षा प्रतिपदा अधिक (वृद्धी) असल्यास लक्ष्मीपूजन दुर्सया दिवशी म्हणजे अमावास्येच्या दिवशी करावे.

वरील नियम पाहता २१ ऑक्टोबर रोजी अमावास्या १७.५४ पर्यंत असून ३ प्रहरापेक्षा अधिक आहे आणि प्रतिपदा समाप्ती ०८.१६ असल्याने प्रतिपदा अधिक (वृद्धी) आहे. म्हणून धर्मसिंधुमधील वरील वचनानुसार दिनांक २१ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेले लक्ष्मीपूजन शास्त्रसंमत आहे. तसेच अमावास्या आणि प्रतिपदा यांचे युग्म असल्याने युग्मास महत्त्व देऊन प्रतिपदायुक्त अमावास्येच्या दिवशी लक्ष्मीपूजन करावे असे वचन असल्याने २१ ऑक्टोबर रोजी नेहमीप्रमाणे सांयकाळी व प्रदोषकाळात (सूर्यास्तानंतर सुमारे २ तास २४ मिनिटे या कालावधीत) लक्ष्मीपूजन करावे.

तसेच २१ ऑक्टोबर रोजी काही प्रदेशांत ०५.५४ पूर्वी सूर्यास्त होत असल्याने त्या गावी दिनांक २१ ऑक्टोबर २०२५ रोजी मंगळवारी लक्ष्मीपूजन असणार आहे.

**२१ ऑक्टोबर २०२५ रोजी लक्ष्मीपूजन शुभ मुहूर्त सांयकाळी ०६.१० ते रात्री ०९.४० पर्यंत.**

# देवी लक्ष्मीचे ८ रूपे अष्टलक्ष्मी आणि त्यांचे अर्थ जाणून घ्या...

**देवी लक्ष्मीच्या कृपेने मानवांना संपत्ती, समृद्धी आणि आनंद मिळतो. देवी लक्ष्मीचे आठ वेगवेगळे रूप आहेत, ज्यांना अष्टलक्ष्मी म्हणतात. अष्टलक्ष्मीची पूजा केल्याने सर्व मानवी समस्या दूर होतात आणि समृद्धी, संपत्ती, कीर्ती, ऐश्वर्य आणि समृद्धी मिळते. अष्टलक्ष्मी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लक्ष्मीच्या या आठ रूपांचे रहस्य जाणून घ्या. महालक्ष्मी, ज्या वैकुंठात वास्तव्यास आहे. स्वर्गलक्ष्मी, ज्या स्वर्गात वास्तव्यास आहे. राधा, ज्या गोलोकात वास्तव्यास आहे.**

**१.धनलक्ष्मी –** धनलक्ष्मीच्या रूपात देवी लक्ष्मी तिच्या भक्तांच्या आर्थिक समस्या आणि दारिद्र्य दूर करते, त्यांची घरे संपत्ती आणि समृद्धीने भरते. धनलक्ष्मीचा आशीर्वाद घेतल्याने व्यर्थ खर्च, कर्ज आणि सर्व आर्थिक त्रासांपासून मुक्तता मिळते. **ॐ धनलक्ष्म्यै नमः**

**२.यशलक्ष्मी –** देवी लक्ष्मीची यशलक्ष्मी किंवा ऐश्वर्य लक्ष्मी म्हणून पूजा केल्याने तिला सांसारिक सन्मान, कीर्ती आणि समृद्धी मिळते. कीर्ती देणारी ही देवी तिच्या भक्तांना ज्ञान आणि नम्रता प्रदान करते आणि सांसारिक शत्रुत्व दूर करते. **ॐ यशलक्ष्म्यै नमः**

**३.आयुलक्ष्मी –** दीघार्युष्य आणि रोगमुक्त आयुष्य सुनिश्चित करण्यासाठी देवी लक्ष्मीची पूजा आयुलक्ष्मी म्हणून केली जाते. देवीचे हे रूप शारीरिक आणि मानसिक आजारांपासून मुक्तता देते आणि व्यक्तीचे आयुष्य वाढवते. **ॐ आयुलक्ष्म्यै नमः**

**४.वाहनलक्ष्मी –** वाहनाची इच्छा असलेल्यांसाठी वाहन लक्ष्मीची पूजा करणे शुभ मानले जाते. तिच्या आशीवार्दामुळे वाहनाला आराम मिळतो आणि त्याचा योग्य वापर सुनिश्चित होतो. **ॐ वाहनलक्ष्म्यै नमः**

**५.स्थिरलक्ष्मी –** स्थिरलक्ष्मीची पूजा केल्याने अन्नपूर्णाच्या रूपात देवी लक्ष्मी घरात कायमची राहते. तिच्या आशीवार्दाने घर नेहमीच संपत्ती आणि समृद्धीने भरलेले असते. **ॐ स्थिरलक्ष्म्यै नमः**

**६.सत्यलक्ष्मी –** सत्यलक्ष्मीच्या कृपेने, एखाद्या व्यक्तीला घराची लक्ष्मी म्हणजेच त्याच्या पसंतीची पत्नी मिळते, जी नेहमीच एक चांगला मित्र, सल्लागार आणि जीवनसाथी बनून त्याला साथ देते. **ॐ सत्यलक्ष्म्यै नमः**

**७.संतानलक्ष्मी –** निपुत्रिक जोडप्यांनी संतान लक्ष्मीची पूजा केल्याने मुलाचा जन्म होतो आणि त्यांच्या वंशाची वाढ होते. संतान लक्ष्मीच्या रूपात, देवी माता इच्छितेनुसार संतान प्रदान करते. **ॐ संतानलक्ष्म्यै नमः**

**८.गृहलक्ष्मी –** देवी लक्ष्मीची गृहलक्ष्मी स्वरूपात पूजा केल्याने घराचे स्वप्न पूर्ण होते. शिवाय, इतर घरगुती समस्या देखील लवकर सुटतात. या स्वरूपात, देवी धन प्रदान करते. **ॐ गृहलक्ष्म्यै नमः**

१ धनलक्ष्मी किंवा वैभवलक्ष्मी, २ गजलक्ष्मी, ३ अधिलक्ष्मी, ४ विजयालक्ष्मी, ५ ऐश्वर्या लक्ष्मी, ६ वीर लक्ष्मी, ७ धन्या लक्ष्मी, ८ संतान लक्ष्मी. याशिवाय काही ठिकाणी तिची १ आद्यलक्ष्मी, २ विद्यालक्ष्मी, ३ सौभाग्यलक्ष्मी, ४ अमृतालक्ष्मी, ५ कमलालक्ष्मी, ६ सत्यलक्ष्मी, ७ ८ विजयालक्ष्मी, ९ भोगलक्ष्मी आणि १० योगलक्ष्मी म्हणून पूजा केली जाते.

# दिवाळीत पाल दिसल्यास लगेच करा हे एक काम

**दिवाळीच्या दिवशी, विशेषतः लक्ष्मी पूजनाच्या वेळी पाल दिसणे हे आपल्या पारंपरिक श्रद्धेनुसार शुभ संकेत मानले जाते. चला यामागील धार्मिक आणि सांस्कृतिक अर्थ समजून घेऊया-**

### लक्ष्मी पूजनाच्या वेळी पाल दिसण्याचे महत्त्व :

- **लक्ष्मी आगमनाचे प्रतीक –** दिवाळी ही लक्ष्मी पूजनाची रात्र असते आणि त्या रात्री पाल दिसणे हे असे मानले जाते की देवी लक्ष्मी तुमच्या घरात प्रवेश करत आहे कारण पाल नेहमी प्रकाशाच्या दिशेने जाते, आणि दिवाळीच्या रात्री सगळीकडे दीपप्रकाश असतो. त्यामुळे तिला समृद्धी आणि शुभतेचे प्रतीक मानले जाते.
- **प्रकृतीचा संदेश –** काही ठिकाणी असे मानले जाते की पाल दिसणे म्हणजे घरात ऊर्जा प्रवाह चांगला आहे कारण पाल उष्णता आणि प्रकाशाच्या ठिकाणी जाते. याचा अर्थ तुमच्या घरात सकारात्मक स्पंदने आहेत.
- **पारंपरिक विश्वासानुसार शुभसंकेत –** काही शास्त्रांमध्ये सांगितले आहे की पाल कोणत्या दिशेने दिसते यावरून शुभ-अशुभ संकेत मिळतात. जसे उत्तरेकडे पाल दिसली तर धनलाभ, पूर्वेकडे दिसली तर शुभ कार्य सिद्धी, दक्षिणेकडे दिसली तर खर्च, पश्चिमेकडे दिसली तर सुख आणि समाधान असे संकेत मानले जातात. तसेच पाल प्रार्थना कक्षात दिसल्यास देवी लक्ष्मीच्या आशीवार्दाचे प्रतीक आहे, जी घरात कायमस्वरूपी संपत्ती आणते. दिव्याजवळ किंवा लक्ष्मीच्या मूर्तीजवळ दिसणे आर्थिक समस्यांचा अंत दर्शवते. जर ते मुख्य खोलीत दिसले तर ते कौटुंबिक ऐक्य वाढवते. स्वयंपाकघरात दिसणे हे भरपूर अन्न आणि आरोग्य दर्शवते. जर पाल डोक्यावर पडली तर ते शाही आनंदाचे प्रतीक आहे. वास्तुनुसार, उत्तर दिशेला पाल दिसणे सर्वात शुभ असते.

वेळी
घार ाता
स्वच्छता, उजळ दीप आणि मंगल वास असतो. अशा वातावरणात पाल येणे म्हणजे निसगार्ची उपस्थिती आणि संतुलनाचे चिन्ह आहे.

- **वैज्ञानिक दृष्टिकोन –** वैज्ञानिकदृष्ट्या, पाल प्रकाश आणि उष्णतेकडे आकर्षित होते, म्हणून दिवाळीत ती जास्त दिसते. त्यामुळे यामागे श्रद्धा आणि विज्ञान दोन्ही आहेत.

### पाल दिसल्यावर काय करावे

पाल दिसल्यास लगेच मंदिर किंवा मूर्तीजवळ ठेवलेले कुंकु आणि अक्षता आणून दूरवरून पालीवर शिंपडा. असे करताना, तुमच्या मनातील इच्छा शांतपणे म्हणा आणि ती पूर्ण होण्यासाठी प्रार्थना करा. दिवाळीच्या लक्ष्मी पूजनाच्या वेळी पाल दिसणे हे शुभ आणि समृद्धीचे लक्षण मानले जाते. ते आपल्या घरात धन, सुख आणि देवी लक्ष्मीचे आगमन दर्शवते.

# दिवाळीतील प्रदूषणामुळे त्वचा, डोळे, श्वसनाचा धोका

कोरडी किंवा संवेदनशील त्वचा असलेल्या व्यक्तींना या काळात खाज, लालसरपणा किंवा पुरळसदृश प्रतिक्रिया जाणवू शकतात. डोळ्यांभोवतीची त्वचा नाजूक असल्याने ती धूर आणि हवेत तरंगणाऱ्या कणांमुळे अधिक त्रासदायक ठरते. डॉक्टरांनी सांगितले की, बाहेर जाणे मर्यादित ठेवणे, डोळे व त्वचेचे संरक्षण करणे आणि संतुलित आहार घेणे आदी गोष्टी पाळल्यास सर्वांना सुरक्षित आणि आरोग्यदायी दिवाळी साजरी करता येईल.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

दिवाळीचा प्रकाश आणि रंग घराघरात आनंद घेऊन येतो, पण या उत्सवाबरोबरच वाढणाऱ्या हवेतील प्रदूषणाविरुद्ध खबरदारी घेण्याचे आवाहन डॉक्टरांकडून करण्यात आले आहे. फटाक्यांच्या धुरातून, रसायनांमधून आणि सूक्ष्म धुळीतून निर्माण होणारे घटक त्वचा, डोळे आणि श्वसनसंस्थेसाठी हानिकारक ठरू शकतात. ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलचे अंतर्गत औषध विभागाचे संचालक डॉ. अमित सराफ यांनी सांगितले की, फटाके फुटल्यावर त्यातून सूक्ष्म कण आणि जड धातू हवेत दीर्घकाळ राहतात. हे कण इतर हवेतील प्रदूषकांबरोबर एकत्र येऊन दाट धूर किंवा स्मॉग तयार करतात, जो चेहऱ्यावर, हातांवर आणि डोळ्यांवर बसतो. त्वचा हा शरीराचा संरक्षक थर असला तरी या प्रदूषणामुळे ती बंद, कोरडी आणि सूजलेल्या अवस्थेत जाते,ह्व असे त्यांनी सांगितले.



एनआयओ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. आदित्य केळकर यांच्या मते, दिवाळीत डोळ्यांमध्ये होणाऱ्या जळजळीचे मुख्य कारण म्हणजे फटाक्यांच्या धुरात असलेली रासायनिक घटक. 'धुरातील रसायने आणि सूक्ष्म कण डोळ्यांत लालसरपणा, खाज, चुरचुर आणि पाण्याचा अतिरेक करतात. अगदी थोड्या वेळाच्या संपर्कानेही ॲलर्जी किंवा संवेदनशील लोकांना डोळ्यांमध्ये अस्वस्थता जाणवू शकते,' असे ते म्हणाले. डॉ. केळकर यांनी सांगितले की, 'फटाके हाताळणाऱ्या मुलांवर नेहमी प्रौढांनी लक्ष ठेवावे आणि सुरक्षित अंतर राखावे. डोळ्यांसाठी संरक्षणात्मक चष्म्यांचा वापर केल्यास ठिणग्या, धूर आणि कचरा यापासून जखमा टाळता येतात,' असा सल्ला त्यांनी दिला.

डॉ. सराफ यांच्या मते, वेळेचे नियोजन केल्याने प्रदूषणाचा परिणाम कमी करता येतो. ''फटाके संध्याकाळी लवकर फोडणे आणि प्रदूषणाच्या शिखर वेळेत खिडक्या बंद ठेवणे योग्य ठरेल. घरात एअर प्युरिफायर किंवा एक्झॉस्ट फॅन वापरल्यास हवेमधील धूर कमी होतो आणि आरोग्य टिकवून ठेवता येते,'' असे त्यांनी सांगितले. वॉक्हार्ट हॉस्पिटल, मुंबई सेंट्रल येथील अंतर्गत औषधतज्ज्ञ डॉ. ऋतुजा उगाळमूळे यांनी सांगितले की, वृद्ध व्यक्ती विशेषतः संवेदनशील असतात. 'मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा हृदय व फुफ्फुसाचे आजार असलेल्या रुग्णांना प्रदूषण आणि दिनक्रमातील बदलांचा अधिक परिणाम होतो,' असे त्या म्हणाल्या. कुटुंबीयांनी या काळात नियमित जेवण, पाण्याचे सेवन आणि औषधांचा वेळ सांभाळावी तसेच खजूर किंवा नैसर्गिक गोडपणाच्या घटकांनी बनवलेले मधुमेही-अनुकूल गोड पदार्थ द्यावेत, असा त्यांनी सल्ला दिला.

हृदयशल्य चिकित्सक डॉ. पवन कुमार यांनी इशारा दिला की, प्रदूषणामुळे दम्याचे आणि हृदयविकाराचे त्रास वाढू शकतात. वृद्धांनी फटाके फोडण्याच्या वेळेत घरात राहावे, औषधे जवळ ठेवावीत आणि एअर प्युरिफायर असल्यास त्याचा वापर करावा,ह्व असा त्यांनी सल्ला दिला.

### केंद्राकडून महाराष्ट्रातील पूरग्रस्तांना १,५६६ कोटींची मदत


# कर्नाटकलाही ३८४ कोटींचा निधी जाहीर

**■नवी दिल्ली। प्रतिनिधी,**

राज्याच्या विविध भागात सप्टेंबरमध्ये आलेल्या पुरामुळे हजारो शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. राज्य सरकारने पूरग्रस्तांना मदत दिल्यानंतर सर्वांचे लक्ष केंद्र सरकारच्या मदतीकडे लागले होते. केंद्र सरकारने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना १५६६.४० कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून (एसडीआरएफ) केंद्राच्या वाट्याचा दुसरा हप्ता म्हणून १,९५०.८० कोटी रुपयांच्या आगाऊ निधीला मंजुरी दिली आहे. या रकमेतून कर्नाटकसाठी ३८४.४० कोटी रुपये आणि महाराष्ट्रासाठी १,५६६.४० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या निधीद्वारे यंदा नैऋत्य मोसमी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून तत्काळ मदत पुरविण्यासाठी दोन राज्यांना सहाय्य मिळणार आहे, असे एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र सरकार पूर, भूस्खलन आणि ढगफुटीग्रस्त राज्यांना सर्वतोपरी मदत



देण्यास वचनबद्ध आहे, असे निवेदनात म्हटले आहे. यंदा केंद्राने आधीच 'एसडीआरएफ' अंतर्गत २७राज्यांना १३,६०३.२० कोटी रुपये आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीअंतर्गत (एनडीआरएफ) १५ राज्यांना २,१८९.२८ कोटी रुपये वितरित केले आहेत.

याशिवाय, राज्य आपत्ती शमन निधीअंतर्गत (एसडीएमएफ) २१ राज्यांना ४,५७१.३० कोटी रुपये आणि राष्ट्रीय आपत्ती शमन निधीअंतर्गत (एनडीएमएफ) नऊ राज्यांना ३७२.०९ कोटी रुपये देण्यात आले आहेत. केंद्र सरकारने सर्व पूर, भूस्खलन आणि ढगफुटीग्रस्त राज्यांना आवश्यक तांत्रिक आणि लष्करी सहाय्य पुरवले असून, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), लष्कर आणि हवाई दलाच्या पथकांचीही तत्काळ तैनाती करण्यात आली आहे. यावर्षीच्या मान्सून काळात ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये बचाव आणि मदत कार्यासाठी 'एनडीआरएफ' च्या १९९ पथकांची विक्रमी तैनाती करण्यात आली होती.

# नवीन वर्षात होणार कल्याणवासियांची वाहतूक कोंडीतून मुक्ती! सॅटिस पुल कधी खुला होणार

**■कल्याण। प्रतिनिधी,**

कल्याण रेल्वे स्थानकात सुरू असलेल्या वाहतूक सुधारणा प्रकल्पातील उड्डाणपुलाचे काम केव्हा पूर्ण होणार याकडे कोंडीने ग्रासलेल्या नागरिकांचे लागलेले आहे. कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी सर्व नागरिकांसाठी एक दिलासादायक बातमी दिली आहे. अनेक अडचणी आल्यानंतर आता २०२६मध्ये या उड्डाणपुलाचे काम अखेर पुर्ण होणार असून तो लवकरच नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध केला जाणार आहे. यामुळे कल्याणमधील



कल्याण डोंबिवली महापालिकेची स्मार्ट सिटी प्रकल्पात निवड झाल्यानंतर कल्याण स्टेशन परिसरात वाहतूक सुधारणा प्रकल्पाच्या कामास २०२१ साली सुरुवात करण्यात आली. २०२३ मध्ये पूर्ण करण्याची मुदत देण्यात आली. मुरबाड रस्त्यावरील सुभाष चौक बैलबाजार चौक दरम्यान १६३० मीटरचा उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या उभारणीत भूसंपादन, एसटी स्थानकाच्या जागेवर काम करण्यास लागणारी ना हरकत, रेल्वेची जागा, हॉटेल्सची बांधकामे, गाळे धारकांचे पुनर्वसन यासारख्या तांत्रिक अडचणीमुळे हे काम रखडले होते. आता यातील १३४६ मीटरचे काम पूर्ण झाले असून अडथळे दूर झाल्याने उर्वरित काम देखील वेगाने पूर्ण करणे शक्य होऊ शकेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

नागरिकांचा वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न सुटणार आहे.

या उड्डाणपुलावर गुरुवारी रात्री १२:३० वाजल्यापासून पहाटे २ वाजेपर्यंत गर्डर टाकण्याचे काम करण्यात आले. दरम्यान या प्रकल्पातील तांत्रिक अडचणी दूर करत जानेवारी ते एप्रिल दरम्यान सॅटिस प्रकल्पासह सर्व उड्डाणपूल टप्प्याटप्प्याने सुरू होणार असल्याचे आयुक्त अभिनव गोयल यांनी सांगितले. यामुळे नव्या वर्षात स्टेशन परिसरातील कोंडी फुटणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**अडथळे दूर होणार**

या प्रकल्पात रेल्वे स्थानक परिसरात एकाच ठिकाणी बस थांबा, रिक्षा वाहनतळ, दुचाकी, चारचाकी वाहनतळ प्रवासी पादचारी मार्गिका उपलब्ध करून दिल्या जाणार असून शहराबाहेरून येणारी वाहने रेल्वे स्थानक भागातील वाहतुकीला अडथळा ठरणार नाहीत अशा पद्धतीने उड्डाण पुलावरून परस्पर निघून जावीत अशा पद्धतीने या पुलाची उभारणी केली जाणार असल्याचे कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी सांगितले.

# क्रेडिट कार्डवर ३ रुपये शिल्लक ठेवत लाखोंची लूट

**■मुंबई। प्रतिनिधी,**

आपल्या क्रेडिट कार्डची किती मर्यादा आहे, याची माहिती फक्त दोघांनाच असते. पहिला क्रेडिट कार्डधारक आणि दुसरी बँक! मात्र, मुंबईत एक अशी विचित्र घटना घडली ज्यात क्रेडिट कार्डची मर्यादा आणखी कुणाला तरी ठाऊक होती आणि कोणत्याही ओटीपीशिवाय क्रेडिट कार्डमधून रक्कम काढण्यात आली. हा प्रकार एका आयटी प्रोफेशनलसोबत घडला आहे.

फसवणूक झालेला आयटी प्रोफेशनल (४२) पवईतील एका खासगी कंपनीत काम करतो. त्याच्याकडे एका खासगी बँकेचे क्रेडिट कार्ड आहे. या क्रेडिट कार्डवरील कमाल खरेदी आणि पैसे काढण्याची मर्यादा ५ लाख रुपये आहे. १६ ऑक्टोबरला तो ऑफिसमध्ये असताना त्याला मोबाईल फोनवर अनेक डळढ मेसेज आले आणि त्याच्या खात्यातून ४ लाख ९९ हजार ९९७ रुपये काढण्यात आले होते. याची आयटी प्रोफेशनलने पोलिसांकडे तक्रार केली. त्यावेळी आलेला




ओटीपी कोणालाही शेअर केला नसल्याचे स्पष्ट केले. तरीही ५ लाखांची मर्यादा असताना ३ रुपये कमी करून ४ लाख ९९ हजार ९९७ रुपये काढण्यात आले होते.

या संदर्भात आयटी प्रोफेशनलने बँकेशी संपर्क साधला तेव्हा तो सायबर फसवणुकीचा बळी ठरल्याचे सांगण्यात आले. वास्तविक पूर्वी, सायबर फसवणूक करणारे लोकांना त्यांच्या ओटीपीची बतावणी करून फसवत असत, परंतु अनेक प्रकरणे उघडकीस येत आहेत जिथे लोकांना त्यांच्या मोबाईल फोनवर ओटीपी अलर्ट मिळतात. लोक ओटीपी शेअर न करताही त्यांच्या खात्यातून पैसे दुसऱ्या खात्यात ट्रान्सफर होत आहेत. त्यामुळे फसवणूक करणाऱ्यांनी फिशिंग लिंक किंवा डेटा लीकद्वारे कार्डचे तपशील मिळवले असतील असा पवई प्रकरणात, पोलिसांचा संशय आहे.

**फिशिंग लिंक म्हणजे...**

फिशिंग लिंक ही फसवी लिंक असते. ही लिंक बँक, सरकारी पोर्टल, ई-कॉमर्स साइट किंवा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसारख्या खऱ्या वेबसाइटसारखी दिसते. प्रत्यक्षात वैयक्तिक माहिती चोरण्यासाठी तयार केलेला तो ट्रॅप असतो. लोक फिशिंग लिंकवर क्लिक करताच त्यांचे कार्ड तपशील फसवणूक करणाऱ्यांना ट्रान्सफर केले जातात. कधीकधी व्यक्तीचा मोबाईल नंबर किंवा ईमेल ॲड्रेस हॅक करूनही डेटा चोरीला जातो.

# चिनी ठगांसाठी एमबीए आणि बी.टेक करायचे पगारावर काम डीपफेक व्हिडीओच्या माध्यमातून...

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई सायबर पोलिसांनी शनिवारी (१८ ऑक्टोबर) चिनी ठगांसाठी डीपफेक व्हिडीओ तयार करणाऱ्या चार आरोपींना अटक केली आहे. सर्व आरोपी उच्चशिक्षित असून ते मोठ्या कंपन्यांमध्ये पगारावर काम करत होते. पण चांगला पगार मिळत असतानाही सर्व आरोपी चिनी सायबर ठगांसाठी पगारावर असल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींपैकी चंद्रशेखर भीमसेन नाईक याच्याकडे बी.टेक पदवी असून तो बंगळुरूस्थित एका कंपनीत उपाध्यक्ष आहे. तर बी.टेक केलेला दीपायन तपन बॅनर्जी हा बंगळुरूस्थित कंपनीत मेटा कोऑर्डिनेटर आहे. तसेच एमबीए केलेला नील अरुमुघम हा देखील वरिष्ठ पदावर आहे. तर चौथा आरोपी गिगिल सेबॅस्टियन हा कंपनीत अकाउंट्स प्रमुख आहे. या सर्वांवर सोशल मीडियावर विविध शेअर बाजार तज्ञांचे डीपफेक व्हिडीओ पोस्ट करून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. सेबीच्या एका संशोधन विश्लेषकाने तिचा स्वतःचा डीपफेक व्हिडीओ पाहिला, तेव्हा तिने मुंबई पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर हा सर्व प्रकार समोल आले.

मिळालेल्या माहितीनुसार, देशभरातील विविध पोलीस दलाव्यतिरिक्त, मुंबई सायबर पोलीस अधिकारी देखील या शेअर फसवणुकीच्या प्रकरणांची चौकशी करत होते. आतापर्यंत, पकडलेले अनेक आरोपी असे आहेत, ज्यांच्या खात्यांमधून फसवून केलेली रक्कम मिळाली आहे. या आरोपींच्या चौकशीदरम्यान आणि त्यांच्याशी संबंधित प्रकरणांच्या चौकशीदरम्यान, आसाममधील एक महिला मुंबई पोलिसांच्या तपासाखाली आली. एका पोलीस अधिकाऱ्याच्या मते, ही महिला सोशल मीडिया अकाउंटवर हे डीपफेक व्हिडीओ पोस्ट करायची आणि ती त्याच बंगळुरूस्थित कंपनीत काम करत होती, जिथे शनिवारी चार आरोपींना अटक करण्यात आली.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, फेसबुक आणि इंस्टाग्रामची मूळ कंपनी असलेल्या मेटाने तिच्या खात्यावर नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला होता, परंतु तरीही तिने पोस्ट करणे सुरूच ठेवले होते. ती तिच्या सर्व वरिष्ठांच्या निर्देशानुसार हे डीपफेक व्हिडीओ पोस्ट करत होती. जेव्हा तिची चौकशी करण्यात आली, तेव्हा या रॅकेटचा पदार्फाश झाला. त्यामुळे आता मुंबई पोलीस या महिलेला साक्षीदार बनवतील की आरोपी, हे अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही.

डीसीपी पुरुषोत्तम कराड आणि वरिष्ठ निरीक्षक सुपर्णा शिंदे यांच्या चौकशीत असे दिसून आले की, ज्या बंगळुरूच्या कंपनीतून आरोपींना अटक करण्यात आली होती, ते सर्व चिनी ठगांणा मेटा ॲड आयडी पुरवत होते. चिनी ठग या आयडीचा वापर करून फेसबुक आणि इंस्टाग्रामवर डीपफेक व्हिडीओ अपलोड करत होते. या व्हिडीओंमध्ये लोकांना गुंतवणूक करण्यासाठी आमिष दाखवण्यासाठी विश्वासू गुंतवणूक तज्ञ आणि अँकरचे डीपफेक व्हिडीओ होते. त्यानंतर त्यांना व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये जोडले जात होते आणि त्यांची फसवणूक केली जात होती.

पोलिसांच्या तपासात एक धक्कादायक खुलासा देखील झाला आहे. सायबर फसवणूक करणाऱ्यांनी त्यांच्या संगणक प्रणालीमध्ये सॉफ्टवेअर अपलोड केले होते. या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून फेसबुक, इंस्टाग्राम आणि इतर सोशल मीडियावर दिसणाऱ्या शेअर बाजार तज्ञांच्या डीपफेक व्हिडीओंवर क्लिक करणाऱ्या प्रत्येकाची संपूर्ण माहिती आणि मोबाइल नंबर ॲक्सेस प्रदान करत होते. त्यानंतर त्यांना बनावट शेअर बाजाराच्या काही व्हॉट्सॲप किंवा टेलिग्राम ग्रुपमध्ये जोडले जात असे.



**सेबीचा अधिकारी बनत शेअर बाजारात फसवणूक, डीपफेक व्हिडिओ प्रकरणी चौघांना अटक**

गेल्या काही काळापासून मुंबई सायबर क्राईमच्या घटना वाढू लागल्या आहेत. ऑनलाईन जुगार, डिजिटल अरेस्ट, शेअर मार्केटिंग अशी अनेक प्रलोभने दाखवून अनेकांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. शेअर ट्रेडिंगच्या माध्यामातून सर्वसामान्य गुंतवणुकदारांची फसवणुक करणाऱ्या एका चौकडीला पश्चिम सायबर सेल पोलिसांनी अटक केली. जिजिल सॅबस्टियन, दिपायन तपन बॅनर्जी, डॅनिअल आरुमुघम आणि चंद्रशेखर भीमसेन नाईक अशी या चौघांची नावे आहेत. अटकेनंतर चारही आरोपींना वांद्रे येथील स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. ही टोळी बोगस डिपफेक व्हिडीओ तयार करुन ते सोशल मिडीयावर प्रसिद्धीसाठी ॲडआयडीचा ॲक्सेस आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगारांना देत असल्याचे तपासात उघडकीस आले. यातील तक्रारदार सेबी रजिस्टर रिसर्च अनॉलिस्ट आहेत. ते सध्या मार्केट एक्सपर्ट म्हणून काम करत होते. २९ सप्टेंबरला त्यांना शेअर मार्केटसंदर्भातील एक व्हिडीओ निदर्शनास आला. त्यामध्ये डिपफेक व्हिडीओच्या माध्यमातून अनेकांना विविध शेअरमध्ये गुंतवणुक करण्यास प्रवृत्त करुन त्यांची आर्थिक फसवणुक केली जात होती. या जाहिराती सोशल मिडीयावर प्रसारीत करुन त्याद्वारे ही फसवणुक होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांनी संबंधित आरोपीविरुद्ध सायबर सेल पोलिसांत तक्रार केली होती. संबधित तक्रारीनंतर पोलिसांनी तपास सुरु केला होता. तपासामध्ये या गुन्ह्यांत कर्नाटकच्या बंगलोर शहरात वास्तव्यास असलेले जिजील, दिपायन, डॅनिअल तर ठाण्याचा रहिवाशी असलेला चंद्रशेखर यांचा सहभाग उघडकीस आला होता. त्यामुळे या चौघांना ठाण्यासह बगलोर शहरातून पोलिसांनी अटक केली होती. तपासात या आरोपींनी कंपनीच्या ग्राहकांची कोणतीही पडताळणी न करता त्यांच्या सोशल मिडीयाच्या ॲडआयडी बेकायदेशीर प्राप्त करुन त्यांना डिपफेक व्हिडीओच्या माध्यमातून शेअरमार्केटमध्ये गुंतवणुक करण्यास प्रवृत्त केले होते. या गुंतवणुकींवर संबंधित व्यक्तीची फसवणुक होणार असल्याचे माहिती असताना त्यांचाकडून तीन कोटी भारतीय आणि दुबई चलनाच्या माध्यातून घेतल्याचे उघडकीस आले. त्यासाठी कंपनीच्या अटी आणि शर्तीचे सर्रासपणापणे उल्लघन करण्यात आले होते. आर्थिक लाभासाठी गुंतवणुकदाराचे ॲक्सेस आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगारांना पुरविल्याचे तपासात उघडकीस आले आहे. मुंबईसह भातरात सध्या बोगस ऑनलाईन शेअर ट्रेडिंग गुंतवणुकीद्वारे नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणुक होत आहे. याबाबत अनेक शहरात फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हे दाखल आहे.

# कुर्ला स्टेशनच्या सीसीटीव्हीमध्ये दिसला, बिहारमधील स्टेशनवर अटक, काय आहे प्रकरण?

**■मुंबई। प्रतिनिधी,**

पोलिसांना कधीकधी छोटे छोटे पुरावे सापडतात आणि हेच पुरावे गुन्हेगारापर्यंत घेऊन जातात. याची प्रचिती मुंबई पोलिसांना नुकताच आली. मुंबई गुन्हे शाखेने अशाच सीसीटीव्ही फुटेजवरून आरोपीला बिहारमधील एका रेल्वे स्टेशनवर अटक केली. सुलेमान रज्जाक कुजरा (४०) असे या आरोपीचे नाव आहे. हा गुन्हा मुंबईत घडला आणि त्यानंतर आरोपी पळून गेला होता.

**असा घडला गुन्हा**

१५ ऑक्टोबर २०२५ च्या रात्री वाकोला येथे सुलेमानरज्जाक कुजरा याने त्याची १४ वर्षांची मुलगी असगरीची हत्या केली. एवढंच नाही तर त्याने पत्नी नसीमा (३५) हिलाही गंभीर जखमी केले. आता हे प्रकरण अंगलट येणार हे लक्षात आल्यानंतर त्याने मोबाईल फोन बंद केला आणि घरातून पळ काढला. पत्नी जखमी असल्यामुळे हे प्रकरण लगेच उघड झालं. काही वेळातच वाकोला पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य पाहून मुंबई गुन्हे शाखेच्या युनिट ८, युनिट ९ आणि युनिट १० मधील पथके तपासासाठी तैनात करण्यात आली.

याच घटनेत, तपास पथकाने आरोपीच्या घरातील आणि मुंबईतील विविध रेल्वे स्टेशनांवरील डझनभर सीसीटीव्ही फुटेज पाहिले. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक लक्ष्मीकांत साळुंखे यांनी सांगितले की, कुर्ला रेल्वे स्टेशनातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात तपास पथकाला आरोपी दिसला. त्यानंतर बाजूलाच लोकमान्य टिळक टर्मिनस असल्याने




आरोपी सुलेमान कुर्ला स्टेशनवर आला असावा, असा अंदाज तपास पथकाने लावला. आरोपी मूळ बिहारचा असल्याची माहिती तपास पथकाला त्याच्या वाकोल्यातील शेजाऱ्यांकडून मिळाली होती. शिवाय त्याचा बिहारमधील पत्तादेखील पोलिसांना मिळाला होता. म्हणून, तपास पथकाने बिहारमधील त्याच्या गावी जाणाऱ्या मेल गाड्यांची यादी तयार केली आणि एक पथक बिहारला रवाना झाले. आरोपी बिहारमधील एका रेल्वे स्टेशनवर उतरताच त्याला अटक करण्यात आली.

**हत्येचे कारण**

बापाने मुलीची हत्या करून पत्नीला जबर जखमी करणे यामागे कोणते कारण असावे याचा शोध पोलिसांनी घेतला. तेव्हा गुन्हे शाखेच्या तपासात असे आढळून आले की, आरोपी पक्का दारूड्या होता. तो दारूच्या आहारी गेल्यामुळे पत्न ी आणि मुलीशी त्याचे वारंवार भांडणे होत होती. १५ ऑक्टोबर रोजीही तो मद्यधुंद अवस्थेत होता. अशातच भांडण झाले. त्यांच्यातील भांडण टोकाला गेले आणि दारूच्या आहारी तसेच रागावरील नियंत्रण सुटल्याने सुलेमानने घरातील धारदार शस्त्राने त्यांच्यावर हल्ला केला. यात मुलीचा मृत्यू झाला, तर पत्न ी जबर जखमी झाली.

# ऐन दिवाळीत मुंबईमध्ये अग्नितांडव, १५ वर्षीय मुलाचा मृत्यू

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील कफ परेड परिसरातील एका चाळीत सोमवारी पहाटेच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत होरपळून १५ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आणि तिघे जखमी झाले. ऐन दिवाळीत घडलेल्या या घटनेनं परिसरात खळबळ उडाली होती. दुर्घटनेबाबतची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि एका तासाच्या आत आग विझवण्यात यश आलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कफ परेड येथील मच्छिमार नगरमध्ये आज पहाटेच्या सुमारास एका चाळीत अचानक आग लागली. चाळीत आग लागल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरलं आणि धावपळ सुरू झाली. आगीच्या धुरामुळे आणि ज्वालांमुळे जीव वाचवण्यासाठी नागरिक सैरावैरा धावू लागले. काहींनी याबाबतची माहिती अग्निशमन दलाला दिल्यानंतर अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल जाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नांनंतर एका तासाच्या आत आगीवर नियंत्रण मिळवले. आगीचे स्वरूप पाहता ती विद्युत वायरिंग आणि ईव्ही बॅटरीमुळे लागल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

या दुर्घटनेत एका १५ वर्षीय तरुणाने आपला जीव गमावला आहे. तसंच इतर तीन जखमींना तातडीने उपचारासाठी सेंट जॉर्ज रुग्णालयात दाखल करण्यात आलं. डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार सुरू केले असून त्यांच्या प्रकृती स्थिर असल्याचे समजते. दरम्यान, या आगीचे नेमकं कारण काय होतं, याचा तपास पोलीस करत आहेत. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी पंचनामा केला असून, पुढील तपास सुरू आहे. आगीमुळे मच्छिमार नगरमधील रहिवाशांचं मोठं नुकसान झालं आहे. अनेकांची घरे जळून खाक झाली आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक आमदार आणि खासदार यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००0१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com